**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.३ यांची जबानी**

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो की,

माझे नाव – खंडू रावजी पवार

माझे वय ५२ वर्षे व्यवसाय शेती

राहणार मुथाळणे, ता.अकोले, जि.अहमदनगर.

**<u>सरतपास अभियोग पक्षातर्फे सहाय्यक सरकारी वकील श्रीमती के.आर.उतळे यांचेमार्फत–</u>**

**१.** दिनांक ०७.०६.२०२१ रोजी आम्ही आमचे गट नं.४५५ मधील शेतामध्ये मंचींग पेपर अंथरला होता. दिनांक ०८.०६.२०२१ रोजी सकाळी १०.०० वाजताच्या सुमारास मी खताची गोणी घेवून शेतात चाललो होतो. माझी पत्नी लिला खंडू पवार ही माझ्या अगोदरच शेतामध्ये गेली होती. मी शेतात गेलो त्यावेळी आरोपी माझ्या पत्नीचे केस धरून ओढत होता व तो तिला मारत होता. मी त्यांचे भांडण सोडविण्यासाठी गेलो असता आरोपीने माझ्या उजव्या कानाला चावले. त्यामुळे, माझ्या कानाला दुखापत झाली व मला चक्कर आली. आरोपीच्या म्हशी आमचे शेतातील मंचींग पेपरवरून गेल्यामुळे तो कागद फाटला होता. त्यावरुन ते भांडण झाले होते. आरोपीची पत्नी कांताबाई चंद्रभान पवार ही तेथे आली व तिने भांडणाची सोडवासोडव केली. त्यानंतर मी माझा नातू शुभम मोहिते याचेसोबत समशेरपूर येथील सरकारी दवाखान्यात गेलो. मी माझ्या मुलाला फोन करून घटनेबाबत सांगितले. त्यानंतर मी अकोले पोलीस ठाणे येथे येवून आरोपीविरुध्द घडलेल्या घटनेबाबत फिर्याद दाखल केली. आता मला ती फिर्याद दाखवली. ती फिर्याद तीच आहे. त्या फिर्यादीवर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या फिर्यादीतील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या फिर्यादीला **निशाणी पी–२४** देण्यात आली. त्या फिर्यादीनुसार प्राथमिक खबरी अहवाल नोंदविण्यात आला. तो अहवाल मला

दाखविला. तो अहवाल तोच आहे. त्या अहवालावर माझी सही आहे. ती सही मी ओळखतो. त्या अहवालातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्या अहवालास **निशाणी पी–२५** देण्यात आली. मी आरोपीला पाहिल्यास ओळखू शकतो. आरोपी आजरोजी न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पूर्ण.**
**आरोपीतर्फे विधीज्ञ श्री.डी.के.केदार यांचेतर्फे उलटतपास–**

**२.** हे म्हणणे खरे आहे की, मी व आरोपी सख्खे चुलत व सख्खे मावस भाऊ आहोत. माझ्या जन्मापूर्वी आमचे एकत्र कुटुंब होते. हे म्हणणे खरे आहे की, आमच्या कुटुंबाचा मूळ पुरुष दगडू हा होता. हे म्हणणे खरे आहे की, दगडू याला रावजी व रामकृष्ण ही दोन मुले होती. हे म्हणणे खरे आहे की, रावजी हा थोरला व रामकृष्ण हा धाकटा मुलगा होता. दगडू याला १६ एकर जमीन होती किंवा कसे, हे मला माहित नाही. रावजी याच्या वाटपाला १० एकर व रामकृष्ण याच्या वाटपाला सव्वासहा एकर जमीन दगडूने करून दिली होती किंवा कसे, हे मला माहित नाही.

**३.** रावजी याला मी व बाळचंद्र असे दोन मुले आहोत. हे म्हणणे खरे नाही की, आम्हा दोघांच्या नावांवर १० एकर जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, रामकृष्ण याला आरोपी चंद्रभान व शांताराम ही दोन मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, माझे व आरोपी यांचे दरम्यान जमिनीच्या वाटपावरून वाद आहेत.

**४.** प्रश्न – तुमचे व आरोपीमध्ये म्हशीने कागद फाडल्यावरून भांडण झाले आहे का ?

उत्तर – आरोपीने माझ्या पत्नीला मारहाण केल्यामुळे भांडण झाले.

**५.** माझे व आरोपीमध्ये या घटनेपूर्वी अन्य कोणत्याही कारणांमुळे वाद नव्हता.

६. हे म्हणणे खरे नाही की, माझे फिर्यादीमध्ये माझे व आरोपीमध्ये शेतीच्या बांधावरून वाद होत असतात, असा जो मजकूर लिहिला आहे, तो चुकीचा आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझी व आरोपीची जमीन एकमेकांलगत आहे. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या जमिनीच्या पश्चिमेला वन खात्याची जमीन आहे. हे म्हणणे खरे आहे की, गावातील लोक वन खात्याच्या जमिनीमध्ये जनावरे चारण्यासाठी नेतात.

७. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने वन खात्याच्या जमिनीमध्ये जनावरे चारण्यासाठी सोडली होती व ती जनावरे माझ्या शेतापासून ब–याच अंतरावर चरत होती. हे म्हणणे खरे आहे की, मी व माझी पत्नी शेतामध्ये मंचींग पेपर व ठिबकच्या नळ्या बसविण्याचे काम करीत होतो. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने जनावरे हुसकावून लावली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा वन खात्याच्या जमिनीमधून जनावरे शोधत आमच्या जमिनीजवळ आला असता आम्ही दोघांनी त्याला धरले. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या पत्नीने आरोपीच्या गुप्त अंगाला पिरगळले. हे म्हणणे खरे नाही की, मी आरोपीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने स्वत:ला सोडविण्यासाठी जोराचा हिसका मारला व तो तेथून निघून गेला. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने स्वत:ला सोडविण्यासाठी प्रयत्न केला असता मी माझ्या उजव्या कानावर पडल्यामुळे मला दुखापत झाली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी आमच्या तावडीतून निसटला व तो त्याच्या घरी जावून त्याने घराचा दरवाजा बंद केला. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही आरोपीच्या घराच्या दरवाजावर दगडे मारून त्याला शिवीगाळ केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीची पत्नी कांताबाई ही दुस–याच्या शेतात कामाला गेल्याने घरी नव्हती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीला विनाकारण त्रास देण्यासाठी मी त्याचेविरुध्द खोटी फिर्याद दाखल केली आहे. हे

म्हणणे खरे नाही की, आरोपीकडून पैसे वसूल करण्यासाठी मी त्याच्याविरुध्द खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी फिर्यादीत नमूद केलेली घटना केंव्हाही घडलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीचा सूड घेण्यासाठी मी त्याचेविरुध्द खोटी केस दाखल केली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी याकामी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पूर्ण. फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत
सदरचा जबाब माझे समक्ष नोंदविणेत आला.

DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Digitally signed by DHIRAJ MARUTI HINGLAJKAR
Date: 2025.11.10 18:04:48 +0530

**(डी.एम.हिंग्लजकर)**
**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, अकोले,**
**ता.अकोले, जि.अहमदनगर**

**दिनांक – १०.११.२०२५**